# भारतातील
# राजकीय व सामाजिक चळवळी


मुख्य संपादक
प्राचार्य. डॉ. आय. डी. पाटील
संपादक
प्रा. डॉ. आर. एन. शेवाळे
प्रा. पी. एम. सोनवणे





PRINCIPAL
...aji College, HINGOL...



अथर्व

# अनुक्रमणिका

## शेतकरी चळवळ


- शेतकरी चळवळ ........................................ २५
  – प्रा. डॉ. राठोड डी. बी., कळमनुरी, जि. हिंगोली
- अहमदनगर जिल्ह्यातील शेती विषयक परिवर्तन .............. २८
  – १९ वे शतक
  – प्रा. डॉ. जे. डी. गोपाळ, पाचोरा, जि. जळगांव
- स्वातंत्र्यपुर्व महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ .................. ३६
  – प्रा. डॉ. कृष्णा मालकर, देवगाव (रंगारी) ता. कन्नड
- शेतकरी चळवळ ........................................ ४५
  – श्री. प्रमोद निवृत्ती कपले, मु.पो.ता. मुक्ताईनगर
- शेतमजुरांच्या संघटना व चळवळी ............................ ५३
  – सुभाष पोले, हिंगोली
- भारतातील शेतकरी चळवळ : एक पुनरवलोकन ............ ६०
  – परमेश्वर जाधव, पुणे
- महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ .............................. ६७
  – फड अजय श्रीधर, किनगाव ता. अहमदपूर
- शेतकरी चळवळीचे राजकीय अध्ययन........................ ६९
  – आकाश शेषराव बांगर, हिंगोली
- शेतकरी चळवळ व शेतकरी संघटना .......................... ७३
  – प्रा. डॉ. नामानंद गौतम साठे, कळंब, जि. उस्मानाबाद


## स्त्रीवादी चळवळ


- स्त्रीमुक्ती चळवळी संदर्भातील महात्मा ज्योतीराव फुले ...... ७८
  यांचे योगदान
  – डॉ मेघा संजय पाटील, इस्लामपूर
- भारतातील स्त्रीवादी चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास...... ८७
  – प्रा. सुनिल अजाबराव पाटील, दहिवेल
- भारतातील महिला चळवळीचा ऐतिहासिक आढावा .......... ९४
  – प्रा. शहाणे रंजना प्रल्हादराव, परळी-वैजनाथ




PRINCIPAL
...aji College, HINGOLI

SHIVAJI COLLEGE • HINGOLI

आदिवासी चळवळ


- आदिवासी चळवळ : राजकीय, ऐतिहासिक व ............ २३९
  सामाजिक विश्लेषण
  - प्रा. विरेंद्र मुरलिधर घरडे, नगाव
- संयुक्त महाराष्ट्रातील आदिवासी चळवळ आणि............ २४४
  मुख्यमंत्र्यांची विकासात्मक भुमिका
  - प्रा. डॉ. शुभांगी राठी, भुसावळ - प्रा. दिलीप हरसिंग राठोड, पारोळा
- आदिमांची प्रेरणादायी चळचळ .......................... २५०
  - प्रा. सुरकुले अनिता सोमनाथ, पुणे
- आदिवासी चळवळ ...................................... २५३
  - भालेराव सुधाकर नारायण
- आदिवासी चळवळ ...................................... २५७
  - प्रा. बबन आमले, कन्नड
- नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी जीवन संघर्ष.............. २६२
  - प्रा. डॉ. एम.जी. मोरे, जाफ्राबाद
- आदिवासींनी इंग्रजांविरूद्ध केलेले उठाव आणि चळवळी.... २६६
  - डॉ. क्षिरसागर बी. एस., हिंगोली
- भारतातील आदिवासी चळवळ ........................... २७८
  - प्रा. डॉ. प्रमोद मनोहर पवार, अमळनेर
  - प्रा. तडवी जावेदखाँ याकुबखाँ, मुक्ताईनगर
- भारतातील आदीवासी चवळीचा अभ्यास ................. २८५
  - प्रा. डॉ. सुरेंद्र अंबर मोरे, देवपूर
  - प्रा. अशोक सुखदेव राठोड, धडगाव
- भारतातील आदिवासीच्या समस्या आणि उपाययोजना...... २९१
  - मोहन ओंकार बेलोकार
- भारतातील आदिवासी चळवळ (हक्क व अंमलबजावणी)... २९६
  - प्रा. ढोली संदिप रामचंद्र, नाशिक


दलित चळवळ


- भारतातील दलित चळवळ ................................... ३०१
  - डॉ. सूर्यकांत माधवराव सांभाळकर, कन्नड




PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI


- महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळ : ए
  - प्रा. प्रकाश मानसाराम सोनवणे, मुक
  - प्रा. महेंद्रसिंग मंगलसिंग चव्हाण, मु
- दलित चळवळ.................
  - डॉ. महेश प्रल्हादराव गोमासे, नेपा
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वर्गीय
  दलित कम्युनिष्ट चळवळ
  - प्रा. वाघमारे एच. टी., चांदोरी, जि.
- भारतातील दलित चळवळ .........
  - डॉ. ज्ञानेश्वर काशिनाथ भामरे, नगां
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोकप
  - परदेशी भगवान ईश्वरलाल, शिरपूर
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलि
  - प्रा. डॉ. रविंद्र पुंडलिक पाटील, न
- दलित महिलांची चळवळ ........
  - डॉ. सौ. शारदा गोविंदराव बंडे, पु
- दलित चळवळ एक बदलती दिशा .
  - प्रा. सौ. कांबळे सुनिता शंकरराव,
- महाराष्ट्रातील दलित चळवळ एक म
  - प्रा. मगरे एम. के., जाफ्राबाद जि
- भारतातील दलित चळवळ ........
  - नारायण रामलाल उंबरे, जळगांव
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरोत्तर दलि
  - प्रा. हनुमंत भारत सरतापे, नवापू
- दलित चळवळ - एक विश्लेषणात
  - प्रा. आर. एस. कोरडे, वरवट ब
- महाराष्ट्रातील दलीत चळवळ......
  - प्रा. पवार बळीराम वसंतराव, वि
- दलित चळवळीत डॉ. बाबासाहेब
  - प्रा. कमलाकर शरद इंगळे, पा
  - प्रा. डॉ. के. जी. पोकळे, चौस




84

# आदिवासींनी इंग्रजांविरूद्ध केलेले उठाव आणि चळवळी

**डॉ. क्षिरसागर बी.एस.**
इतिहास विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

**प्रस्तावना**

भारतीय समाज हा विविधतेने नटलेला आहे. भारतात अनेक धर्म, वंश आणि संस्कृतिचे लोक राहतात. भारतामध्ये ६ हजार पेक्षाही जास्त जाती आणि उपजाती आहेत. जातींप्रमाणे भारतात आदिवासींच्या विविध जमाती आहेत. भारतातील आदिवासी जमातींना विचारवंतानी वेगवेगळ्या नावानी संबोधले आहे. एच. एच. रिजके, लेके, ग्रियर्सन, सोलर्ट, टेलेट्स, सेनविक, मार्टिन या मानवशास्त्रज्ञांनी व भारतीय समाजसुधारक ठक्कर बप्पा यांनी त्यांना आदिवासी शब्दाने संबोधिले आहे, तर बेन्सने वन्य जाती असे म्हटले आहे. प्रो. गुहा यांनी ऑस्ट्रिक भाषा बोलणाऱ्या लोकांबाबत अशाच आशयाचे निरिक्षण केले आहे. भारतातील जवळपास सर्वच राज्यात आदिवासी लोक राहत असलेले आढळून येते. इ. स. १९५० मध्ये भारतातील एकूण १४ राज्यात २१० आदिवासी जमाती अनूसूचित जमातीच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आल्या होत्या. इ. स.२००१ च्या जनगणनेनुसार आदिवासी जमातीची संख्या वाढून ती ५५० झाली. भारतामध्ये आदिवासींची लोकसंख्या या जनगणनेनूसार ८.४ कोटी आहे. म्हणजेच भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ८.२०% लोकसंख्या आदिवासींची आहे. या लोकसंख्येच्या आधारावरच आदिवासी जमातींना ०७% आरक्षण भारतीय संविधानाने दिले आहे.

आदिवासी समाज हा प्रामुख्याने जंगल, पर्वतमय प्रदेश, दऱ्या-खोऱ्यात वास्तव्य करणारा समाज होय. त्यांच्या जीवनपद्धतीवर प्राचीन काळापासून कोणतेही बंधने नव्हती. परंतु जेव्हा भारतामध्ये ब्रिटीश सत्ता स्थापन झाली त्यानंतर मात्र आदिवासींच्या स्वातंत्र्यावर अनेक बंधने आली. त्यांचे जंगल स्वातंत्र्य हिरावणे, जमीनदार आणि सावकारांनी इंग्रजांच्या सहकार्याने भारतातील आदिवासी समुहातील जमातींचे शोषण केले. या शोषणाविरूद्ध आणि सुरक्षितेची हमी मिळविण्यासाठी भारतातील आदिवासींनी इंग्रजांविरूद्ध चळवळी उभ्या केल्या. या चळवळीमध्ये बिहार चेरो, छोटा नागपूर विभागातील संथाल जमात. राजस्थानातील भिल्ल, ओरिसातील कोल्हान प्रदेशातील चळवळ, पूर्व भारतातील सिंगपो, मिशिमी, लुशाई, ऊला, खम्या, खासी, नागा, मिझो यांनीही इंग्रजांना कडाडून विरोध केला. त्याचबरोबर संथाल जमातीनेही गंगा नारायण कान्हू, सिद्धा यांच्या नेतृत्वाखाली चळवळ उभी केली. तर भिल्लांनी कुवर जीवो वसावाच्या नेतृत्वाखाली लढे दिलीत. ओरिसामध्ये खोंड जमातीने चक्रबोशाई मार्फत जमीनदार व इंग्रजांना विरोध केला. यानंतर जुआंग, सरापरा चळवळी उभ्या झाल्या. आंध्रामध्ये पहाडी रॆ चळवळ, बिहारमधील बिरसा मुंडा चळवळ तर देशभर गाजली, आदिलाबाद जिल्ह्यातील गोंड आणि कोलाम जमातीची चळवळ भीमू कुमरा गोंड या नेत्याच्या नेतृत्वाखाली निर्माण झाली. संपूर्ण भारतभर जेथे-जेथे आदिवासींच्या हक्कावर बंधने आली तेथे आदिवासींनी इंग्रजाविरोधात चळवळी उभ्या केल्या.

**आदिवासी कोणास म्हणावे**

प्राचीन काळापासून दऱ्याखोऱ्यात किंवा जंगलात निवास करणारे लोक म्हणजे आदिवासी होय. इंग्रजीमधील (Tribes) या शब्दाचा अर्थ जमात किंवा जमाती असा होतो. ठक्कर बाप्पा आणि डॉ. व्हेरियर इल्विन यांनी आदिवासींना Abcriginal याचा अर्थ मुळचे निवासी असा होतो. आदिवासी हे जंगलात अथवा डोंगराळ भागात राहतात म्हणून त्यांना वन्यजमाती किंवा गिरीजन असेही म्हटले जाते. परंतु खऱ्या अर्थाने देशाचे मुळचे निवासी मुलनिवासी आदिवासी आहेत.

इ.स.१९३१ च्या लोकसंख्या अहवालात आदिवासींना आदिम जमाती म्हटले गेले. भारत सरकार अधिनियम इ. स. १९३५ मध्ये आदिवासी जमातीच्या लोकसंख्येला मागास जमातीचे नाव दिले गेले. तर इ.स.१९४१ च्या लोकसंख्या अहवालात त्यांना केवळ जमाती म्हटले गेले. भारतीय संविधानात आदिवासींना अनुसूचित (Scheduled Tribes) असे संबोधले आहे. सर्वसाधारणपणे डोंगराळ प्रदेशात आणि जंगलामध्ये वास्तव्य करणाऱ्या, तसेच आधूनिक संस्कृती व जीवनपद्धती पासून अलिप्त आहेत अशा लोकांचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्यात आला आहे. यामुळे आदिवासीं समुहामध्ये अंतर्भूत सर्व जातींना अनुसूचित जमाती या नावाने ओळखले जाऊ लागले.

आदिवासी किंवा जमातीचा अर्थ स्पष्ट करण्याकरिता काही समाजशास्त्रज्ञ व मानवशास्त्रज्ञांनी दिलेल्या व्याख्यांचा आधार घेणे गरजेचे आहे. डॉ. रिव्हर्सच्या मते, "जमात किंवा आदिवासी हा एक सरळ साधा सामाजिक समूह आहे. ज्यातील सदस्य एका समान बोलीभाषेचा वापर करतात व युद्ध वगैरे सारख्या उद्देशपूर्तीकरिता एकत्रित कार्य करतात." तर गिलीन आणि गिलीनएच्या मते, "आदिवासी समाज हा एका विशिष्ठ भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, एक समान बोली भाषा बोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षरओळख नसलेल्या स्थानिक गटांचे एकत्रीकरण आहे."





PRINCIPAL
...ji College, HINGOLI

85

**आदिवासींच्या चळवळी:**

आदिवासी समाज सभ्यतेच्या क्षेत्रापासून दूर जंगलात, पहाडांच्या सान्निध्यात, दऱ्यात वास्तव्य करतो. त्यामुळे त्यांच्यात अंधश्रद्धा, निरक्षरता, बेकारी, दारिद्र्य, अस्वच्छ राहणीमान, कर्जबाजारीपणा प्रामुख्याने दिसून येतो. त्याचबरोबर इतर वर्गीयांच्या शोषणामध्ये आदिवासी समाज अडकून पडलेला आहे. आपणच जंगलाचा राजा आहे, अशी त्यांची धारणा होती परंतु अनेक लोकांनी स्वार्थासाठी त्यांच्यावर अत्याचार व अन्याय केले.

आदिवासींच्या शोषणाची सुरूवात ही ब्रिटीश शासनव्यवस्थेत झाली. इंग्रजांनी केलेले कायदे, धोरणे यांचा आदिवासींच्या जीवनावर विपरीत परिणाम झाला. त्याचबरोबर जमीनदार, सावकार व ठेकेदार यांच्याही अत्याचाराला प्रतिकार म्हणून आदिवासींनी सामुहिकरित्या विरोध केला. या प्रयत्नातूनच आदिवासींच्या चळवळी व उठावांना सुरूवात झाली. आपले अस्तित्व टिकविण्याच्या उद्देशाने त्यांनी ब्रिटीशांना विरोध केला.

**आदिवासींच्या चळवळीचे उद्दिष्टे:**

ब्रिटीश शासन भारतात सुरू होताच आदिवासींच्या स्वातंत्र्यावर बंधने आलीत. आदिवासींचे प्रादेशिक, भौगोलिक अधिकार बांधल्या गेलेत. ब्रिटीशांच्या अन्याय, अत्याचारास विरोध करण्यासाठी आदिवासींनी ब्रिटीशांविरूद्ध लढा उभारला, बऱ्याच जमातींनी शस्त्रास्त्राने इंग्रजांचा प्रतिकार केला. वेठबिगारी पद्धत नष्ट करणे, शेतमजूरी वाढवून देणे, कर्जातून मुक्ती मिळविणे, जंगलाचे हक्क मिळविणे, आपल्या जमिनीवर होणारे आक्रमण थोपविणे, महसूल कमी करण्यासाठी, सर्वात महत्त्वाचे म्हणजे जगण्याचा हक्क मिळविणे, मुंडा राज स्थापन करणे यासाठी आदिवासी समाजाने इंग्रजांविरोधात अनेक चळवळी व सशस्त्र उठाव केले.

**आदिवासी चळवळीची कारणे:**

कोणत्याही चळवळी, उठाव एकाएकी होत नसतात, त्यासाठी विशिष्ट घटक किंवा कारणे जबाबदार असतात. इंग्रजांच्या आगमनापूर्वी आदिवासी समाजात स्थानिक स्वशासन होते. त्यांच्यावर बाहेरच्या शासकाचा दबाव किंवा नियंत्रण नव्हते. परंतू ब्रिटीशकालीन शासनव्यवस्थेत आदिवासींची स्थानिक स्वायत्तता समाप्त झाली. इंग्रजांचे कायदे आदिवासींना असह्य वाटू लागले. त्या कायद्यांना विरोध म्हणूनच त्यांनी उठाव केले. ब्रिटीश शासन, व्यापारी, सावकार, जमीनदार आणि ठेकेदार यांनी आदिवासींच्या अज्ञान व भोळेपणाचा फायदा घेऊन त्यांचे आर्थिक शोषण केले. त्यामुळे आदिवासींमध्ये असंतोष निर्माण झाली. ब्रिटीश काळात इंग्रजी मिशनऱ्यांनी आदिवासींना विशेष प्रलोभणे देऊन त्यांचे धर्मांतर केले. परंतू ब्रिटीशांचे वास्तविक धोरण लक्षात आल्याने धर्मप्रसार कार्याला विरोध म्हणून आदिवासींनी इंग्रजी सत्तेविरोधात उठाव केले. वनसंपत्ती हीच आदिवासींची संपत्ती असते. परंतू शासनाच्या वनधोरणाने आदिवासींचे जंगल संपत्तीवरील अधिकार नष्ट झाले त्यामुळे आदिवासींनी जंगल संपत्तीच्या अधिकारासाठी विद्रोह केला. सभ्य लोकांच्या सहवासामुळे आदिवासींना आपल्या समाजातील काही उणिवा लक्षात आल्या. अधिकारपूर्ण जीवन जगण्यासाठी ते संघटित झाले. या संघटनेतूनच त्यांच्या चळवळींना सुरूवात झाली.

**बिरसा मुंडा चळवळ:**

बिरसा मुंडा या नेत्याच्या नावाने या चळवळीला ओळखले जाते. तत्कालीन बिहार प्रदेशातील छोटा नागपूर भागातील मुंडा लोकांनी 'स्व' स्वाभिमानासाठी हि चळवळ सुरू केली होती.

बिरसा मुंडा यांचा जन्म हलीहातु नावाच्या गावामध्ये एका गरीब कुटुंबामध्ये झाला. दारिद्र्यामुळे बिरसाचे वडिल सुगना मुंडा यांनी ख्रिश्चन धर्म स्विकारला. बिरसाचे शिक्षण ख्रिश्चन मिशनरीतून सुरू झाले. हे शिक्षण घेत असतानाच बिरसाच्या मनात ख्रिश्चन मिशनरी आणि इंग्रजाविरोधी घृणा निर्माण झाली.

इंग्रजी सत्तेपूर्वी मुंडा आदिवासींची स्वतंत्र सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्था होती. त्यांचे अंतर्गत वाद पद्दी पंचायतीमार्फत सोडविले जात. इंग्रजांची राजवट आल्यानंतर पोलिस विभाग, न्यायालये स्थापन झाली. नवीन पद्धतीने महसुल गोळा होऊ लागला. त्यामुळे आदिवासींची परंपरागत सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्था पूर्णत: नष्ट झाली. छोटा नागपूर भागातील आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी सावकार, जमिनदारांनी हडपल्याने मालक असलेले आदिवासी स्वत:च्या जमीनीवर नोकर म्हणून राबू लागले इंग्रजांच्या नव्या व्यवस्थेचा परिणाम मुंडा आदिवासींवर पडला. जगायचे कसे हा मुळ प्रश्न त्यांच्यापुढे होता. इंग्रजांच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी इ. स. १७८९ मध्ये मुंडा आदिवासींनी उठाव केला. इ. स. १८५८ मध्ये आदिवासींनी आपल्या जमीन अधिकाराच्या रक्षणार्थ सरदारी चळवळ सुरू केली. या चळवळीचा परिणाम बिरसा मुंडावर होऊन, बिरसाने आपल्या कुटुंबियासह ख्रिश्चन धर्माचा त्याग केला.

ख्रिश्चन मिशनऱ्या विरूद्ध बिरसा सरदारी चळवळीत सक्रिय झाला. या चळवळीत सहभागी होण्यासाठी त्याने गावोगावी जाऊन संघटन केले. यावेळी बिरसाची आर्थिक स्थिती अतिशय वाईट होती. कुटुंबातील सदस्यांची भूक भागविण्यासाठी त्याने प्रेताच्या धडप्यावरील दागीने विकले. त्यामुळे लोक त्याला बहू बिरसा (वेडा बिरसा) असे म्हणू लागले. पुढे बिरसा जंगलात निघून गेला व

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

एक धार्मिक पुरूष म्हणून लोकांसमोर आला. आदिवासी लोक बिरसाला भूमिवरील आबा मानू लागले. बिरसाजवळ प्रचंड विश्वास होता. तो लोकांना सांगत असे की आपण सर्व एक झाल्यास महाराणीचे राज्य संपेल व आपले राज्य येईल. यामुळे ब्रिटीश सरकारने इ.स. १८९५ मध्ये बिरसाला अटक करून दोन वर्षाची शिक्षा दिली. शिक्षा भोगून परत आल्यानंतर बिरसाने इ.स. १८९७ ला बिरसा सेवा दल स्थापन केले. त्याद्वारे त्याने ब्रिटीशांच्या विरोधात उठाव केला. इ. स. १८९८ मध्ये चालकाडच्या डुंबारी पर्वतराजीत एक मोठी सभा भरवून, आदिवासींची फौज तयार केली. खुंटी हे सैन्याचे मध्यवर्ती केंद्र होते. इ.स. १८९९ ला बिरसाने बुडज, मुठू, सरवादाम इ. कमिशनरवर हल्ले केले. यामुळे ब्रिटीश शासन घाबरले. रांची येथील कमिशनवर फीवर्सने बिरसा चळवळीला नेस्तनाबूत करण्यासाठी गोळीबार, धरपकडीचे सत्र चालू केले. जे आदिवासी धर्मांतर करीत त्यांना सोडले जाऊ लागले. मुंडा आदिवासीवर इंग्रजांनी अनेक अत्याचार केले. मुंडा आदिवासींच्या मुलांची, स्त्रियांची हत्या केली, तरीही मुंडा आदिवासींनी गोरिला युद्धाचा आधार घेऊन इंग्रजांना विरोध करणे चालूच ठेवले. ब्रिटीशांच्या हेरांच्या मदतीने बिरसाला अटक करून रांचीच्या तुरूंगात ठेवले. त्याच्या कमरेत व पायात लोखंडी बेड्या बांधण्यात आल्या होत्या. ९ जून १९०० रोजी बिरसा मुंडाचा जेलमध्येच मृत्यू झाला आणि ही चळवळ कमकुवत झाली. बिरसा सेवा दलाचा नेता नरसिंह मुंडा याने ही चळवळ पुढे रेटण्याचा प्रयत्न केला पण इ.स. १९०७ मध्ये त्याचाही मृत्यू झाल्याने बिरसा मुंडा लोकांची चळवळ शांत झाली.

बिरसा मुंडाने सरकारविरूद्ध विद्रोह केला. आपल्या लोकांच्या स्वातंत्र्यासाठी तो लढला. आदिवासींना शोषणमुक्त करण्याची त्याने शपथ घेतली, सशस्त्र युवकांची सेना उभारली, आदिवासींना त्यांच्या हक्काची जाणिव करून दिली. वनशुल्क देऊ नका, वेठबिगारी करून नका, जंगलावर आमचा पहिला अधिकार आहे तो मिळालाच पाहिजे, असे बिरसाने आदिवासींना आव्हान केले. वाढत्या ख्रिस्ती धर्म प्रचाराला रोकण्याचे व आदिवासी संस्कृती टिकविण्याचे कार्य आदिवासी जमातीमध्ये बिरसा मुंडा या महानायकाने केले. एक लोकनायक, धर्मोपदेशक, समाजसुधारक म्हणून बिरसाचे योगदान मोठे आहे. बिरसा मुंडाचे नाव समोर येताच उलगुलान शब्द आठवतो. कारण बिरसा व उलगूलान यांचा संबंध हा माणूस व सावली असा आहे. सर्वांनी एकाच वेळी एकसंघ होऊन न्यायासाठी लढलेली व्यापक लढाई म्हणजे उलगूलान होय. बिरसाच्या मानवता लढ्याचे हे नाव आहे.

**बंगाल प्रांतातील आदिवासी चळवळी**

बक्सार विजयाने बंगाल प्रांतावर ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाली. इंग्रजांनी शेतकरी, जमीनदार, कारागीर यांचे केलेले आर्थिक शोषण, जुलूम, अत्याचार यास विरोध करण्यासाठी बंगाल, बिहार व ओरिसाच्या प्रदेशातील आदिवासींनी इंग्रजांना प्रखर विरोध झाला.आदिवासी जमातीमध्ये संथाळ जमातीची लोकसंख्या सर्वात जास्त आहे. इ.स.१९९१ च्या जनगणनेनुसार ती ५६,०९,७४८ ऐवढी आहे. संथाळांचे वास्तव्य झारखंड, बंगाल, बिहार, आसाम, मेघालय इ. राज्यामध्ये दिसते. या जमातीचे लोक मेहनती आणि धाडसी म्हणून प्रसिद्ध होते. इंग्रज राजवटीमध्ये या जमातींनी आपल्या हक्क व अस्तित्वासाठी जो लढा दिला तो अद्वितीय आहे. या चळवळीचे नेतृत्व सिद्धू, कान्हू, चांद आणि भैरव या नेत्यांनी केले.

बिहारमध्ये पूर्वी पहाडिया हि जमात शासन करित होती. आपल्या अस्तित्वासाठी त्यांनी इंग्रजांशी लढा दिला. पहाडिया जमातींना शह देण्यासाठी इंग्रजांनी संथाळी लोकांना पहाडिया लोकांच्या परिसरात बसविण्याचे काम केले. इंग्रजांनी पहाडियांना शह देण्यासाठी संथाळाची मदत करून त्यांच्यामध्ये वाद निर्माण केले. आपल्या शासनाचा विस्तार करण्यासाठी इंग्रज पहाडिया व संथाळी जमातींना आपसात लढवित होते. ही बाब संथाळी जमातीच्या लक्षात आली. तिलका मांझी हा संथाळांचा तरूण नेता ब्रिटीशांविरूद्ध लढण्यासाठी सिद्ध झाला. त्याने लोकांचा विश्वास संपादित करून, संघटन केले व इंग्रजी सत्तेचा शेवट करण्याचा निश्चय केला. तिलका मांझीने स्वातंत्र्याच्या पहिल्या लढ्याची सुरूवात केली. त्याने आपल्या संघटित सेनेसह ब्रिटीशांसोबत मुंगेर, भागलपूर आणि संथाल परगण्याच्या प्रदेशात अनेक लढाया केल्या. ब्रिटीश सेनापती क्लीवलॅडला मांझीने धनुष्यबाणाने ठार केले. यामुळे इंग्रजांनी तिलका मांझीला चौकून घेरले. मांझी इंग्रजांच्या हाती सापडला. इंग्रजांनी तिलक मांझीला अतिशय क्रुरपणे मारले. तो या स्वातंत्र्य लढ्याचा पहिला सेनानी होता.

संथालांच्या जमीनी इंग्रजांनी हडप केल्याने त्यांच्यावर वेठबिगारीवर काम करण्याची वेळ आली. काही आदिवासी हटवादी या प्रकाराखाली काम करित. हटवादी, जीवनभर कर्जातच राहयचे. सावकार संथालांना कर्ज देऊन त्यांच्याकडून जास्त व्याज घेत. संथालांनी इंग्रजांकडे सावकारांच्या तक्रारी केल्या पण ब्रिटीशांनी लक्ष दिले नाही. यामुळे इ.स. १८५४ मध्ये महेशलाल दरोगा विरोधात संथालांनी चळवळ सुरु केले. सिद्धा आणि कान्ह या दोघांच्या आव्हानावरून ३० हजार संथालांनी ३० जून १८५५ ला कलकत्ता सर केले. महेशलाल दरोगाने संथालावर अन्याय केला होता. म्हणून त्यांनी त्याचे डोके धडावेगळे केले. यामुळे जमीनदार, सावकार, महाजन पळून गेले. संथालांचा विजय झाला. भागलपूर आणि राजमहालमधील रेल्वे आणि डाक संपर्क तोडण्यात आले. ढोल वाजविले कि





PRINCIPAL
College, HINGOLI

४७

दहा हजार संथाल लोक एकत्र येत. इंग्रजांनी शेवटी मार्शल लॉ घोषीत केला. ९ ऑगस्ट १८५५ पर्यंत इंग्रज व संथालात अनेक लढाया होऊन त्यामध्ये ५० हजार संथाल मारले गेले. संथालांच्या चळवळीमुळे इंग्रजांनी हा अधिनियम पास करून संथाल परगणा नावाचा नवा जिल्हा निर्माण करण्यात आला. तसेच वेठविगारी, प्रथेमध्येही सुधारणा झाल्या. इ.स.१८५६ मध्ये कान्हू व त्याच्या साथीदारांना कैदेत टाकले. संथाल लोकांची चळवळ ब्रिटीशांनी अतिशय क्रुरपणे नेस्तनाबूत केली असली तरी ब्रिटीशांना आपल्या धोरणात बदल करावा लागला.

इंग्रजांच्या अन्यायकारक महसूलविषयक धोरणाच्या विरोधात हो जमातीने इ. स. १८२० पासून बंड पुकारले. छोटा नागपूर व सिंगभूम या भागात हो जमातीचे वास्तव्य होते व हा भाग इंग्रजांच्या ताब्यात होता. इ. स. १८२० ते इ. स. १८२७ असा सात वर्षे हा लढा चालू होता. इंग्रजांच्या लष्करी सामर्थ्यासमोर हो जमातीची शक्ती तोकडी असल्याने ते इंग्रजांपुढे पराभूत झाले. इ. स. १८३१ मध्ये जेव्हा नागपूरच्या भागात मुंडांचा उठाव झाला तेव्हा हो जमातीचा समूह मुंडांच्या उठावामध्ये सहभागी झाला.

बंगालच्या मिदनापूर जिल्ह्यात चुआर या आदिवासी जमातीचे वास्तव्य होते. इ.स. १७६५ मध्ये इंग्रजांनी हा भाग ताब्यात घेतल्याने दलभूमचा शासक जगन्नाथ धाल व स्थानिक जमीनदार यांनी आपल्या अमलाखालील चुआरांना एकत्र करून इ.स. १८६८ मध्ये सशस्त्र उठाव केला. इंग्रजांना महसूल देण्याचे नाकारून उठावाची सुरवात झाली. हा लढा सुमारे तीस वर्षे चालला.

बारभूम व सिंगभूमच्या भागातील आदिवासींनी गंगा नारायण यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजांविरोधी निशाण फडकाविले. इ.स. १९३२ मध्ये आदिवासींनी इंग्रजांच्या शासकीय कार्यालयांवर व चौक्यांवर हल्ले करण्याचे सत्र सुरू केले, हे हल्ले अत्यंत प्रखर असल्याने शेवटी इंग्रजांना या हल्ल्याचा बीमोड करण्यासाठी बळाचा वापर करावा लागला.

ओरीसामध्ये खोडमल हा पर्वतीय प्रदेश आहे. या पर्वतीय प्रदेशात खोड जमातीची वस्ती होती. दोरा बिसाई याच्या नेतृत्वाखाली खोड जमातीने इंग्रजांच्या आर्थिक शोषणाच्या प्रतिकारासाठी इ.स. १८३३ मध्ये बंड पुकारले. हे बंड इंग्रजांनी दडपून टाकले; परंतु इ.स. १८४६ मध्ये पुन्हा चक्र बिसाईच्या मार्गदर्शनाखाली खोडांनी उठाव केला. इंग्रजांनी हा उठाव उखडून टाकण्यासाठी खोड प्रमुखांना पदच्युत केले. शेवटी चक्र बिसाईला खोडमलचा प्रदेश सोडून जीव वाचविण्यासाठी पर्वतीय प्रदेशाचा आश्रय घ्यावा लागला. इ.स. १८५४ पर्यंत चक्र बिसाईचा संघर्ष चालू होता.

पागल पंथी संप्रदाय हा आपल्या अनुयायांना सत्य, समता व बंधुभावाचे धडे देत असे. करम शहा हे धर्मगुरू या संप्रदायाचे प्रमुख होते. अनेक हिंदूही त्यांचे अनुयायी होते. त्यांचा मुलगा टिपू याने शेतकऱ्यांना संघटित करून अन्यायी जमीनदारांविरूद्ध व जमीनदारांना संरक्षण देणाऱ्या इंग्रजांविरूद्ध शस्त्र उचलले. जमीनदारांना पळवून लावून स्वतःचे प्रशासन सुरू केले. पागल पंथीयांचा लढा इ. स. १८१३ ते इ. स.१८३३ पर्यंत चालू होता; परंतु इंग्रजांच्या शक्तीसमोर त्याचे बळ कमी पडले. इ. स. १८५२ मध्ये झिंद येथे त्यांचा मृत्यू झाल्याने पागल पंथीयांची चळवळ मंदावल्या गेली.

**पूर्व भारतातील आदिवासींच्या चळवळी**

बंगालमध्ये इंग्रजांची सत्ता स्थापन झाल्यानंतर इंग्रजांनी आपले लक्ष पूर्व भारताकडे वळविले. इ. स. १८२४ मध्य पूर्व भारतातील आसाम व सिल्हरच्या प्रदेशावर इंग्रजांनी आपली सत्ता प्रस्थापित केली. या पर्वतीय भागामध्ये काही वन्य आदिवासी जमातींचे वास्तव्य होते या आदिवासी जमातींच्या दैनंदिन जीवनातील इंग्रजांचा व ख्रिस्ती मिशनरींचा हस्तक्षेप आदिवासींना असह्य झाला. त्याचा परिणाम इंग्रजांविरोधी लढ्यात झाला.

आसामच्या पर्वतीय प्रदेशामध्ये खासी ही आदिवासी जमात राहत होती. इ.स. १८२८ मध्ये इंग्रज व ब्रह्मदेश यांच्यात युद्ध सुरू झाले. या युद्धामध्ये लष्कराच्या हालचाली गतिशील होण्यासाठी इंग्रजांनी खासींच्या प्रदेशामध्ये रस्ते बांधणीच्या कामानिमित्ता प्रवेश केला. हा त्यांचा प्रवेश खासींना सहन झाला नाही. इंग्रजांना विरोध करण्यासाठी तीरथ सिंग या जमीनदाराने खासींचे नेतृत्व केले. खासींनी इ.स. १८३३ पर्यंत इंग्रजांच्या ठाण्यावर छापे मारण्याचे सत्र सुरू करून इंग्रजांना सळो की पळो केले.

मणिपूर भागातील लुशाय टेकड्यांच्या पायथ्याशी कुकी ही आदिवासी जमात वास्तव्यास होती. इंग्रजांचा हस्तक्षेप यांनाही रूचला नाही. त्यामुळे कुकींनी इंग्रजांसमोर मोठे आव्हान उभे करून ब्रिटिश प्रदेशावर हल्ले केले. हे हल्ले इ.स. १८२६ ते इ.स. १८४८ पर्यंत चालूच होते. पर्वतीय प्रदेशाची इंग्रजांना माहिती नसल्याने कुकींचा बंदोबस्त करणे अशक्य झाले. त्यामुळे इंग्रजांनी भेदनीतीचा अवलंब करून कुकी लोकांत फूट पाडून कुकींचे बंड मोडून काढणे.

पूर्व भारतातील दीनापूर भागात नागा जमात राहत होती. या जमातीने इ.स. १८४९ ते इ.स. १८५१ या काळात ब्रिटिश अधिकारी व सैनिकांवर हल्ले करून इंग्रजांना हैराण केले; परंतु इंग्रजांनी क्रूर पद्धतीने नागांचे बंड दडपून टाकले. शेवटी नागांनी इंग्रजांपुढे शरणागती पत्करली. तसेच इ.स. १८३७ ते इ.स. १९४२ या काळात सिंगपो या आदिवासी जमातीनेही इंग्रजांविरोधात शस्त्र उचलून चळवळ उभी केली.

PRINCIPAL
...vaji College, HINGOLI

## पश्चिम भारतातील आदिवासींच्या चळवळी

दक्षिणेमधील शक्तिशाली म्हैसूरच्या टिपू सुलतानाचे राज्य नष्ट करून सर्व दक्षिण भारतावर इंग्रजांनी ताबा मिळविला. पश्चिम भारतावर मराठ्यांची सत्ता होती; परंतु १९ व्या शतकापर्यंत मराठ्यांनाही इंग्रजांनी आपल्या अधीन केले होते. इ.स. १८१८ ला पेशवाई नष्ट झाली. पेशवाई नष्ट होताच संपूर्ण पश्चिम भारतही इंग्रजांच्या ताब्यात आला. पश्चिम भारतातही अनेक नामवंत सरदारांनी, आदिवासींनी व शेतकऱ्यांनी इंग्रजांविरोधात उठाव केले.

महाराष्ट्रामध्ये जोपर्यंत मराठी सत्ता अस्तित्वात होती, तोपर्यंत रामोशांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात राजसत्तेचा हस्तक्षेप नव्हता; परंतु पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजांनी शेतकऱ्यांबरोबरच आदिवासींवरही नव-नवे कर आकारले. हलाखीचे जीवन जगत असलेल्या रामोशी या जमातीला कर देणे असह्य झाले. दुखावलेल्या रामोशी या जमातीचे नेतृत्व उमाजी नाईकांनी करून इंग्रज सत्तेला आव्हान दिले.

उमाजी नाईक व त्याचा सहकारी बापू त्रिंबकजी सावंत यांनी इंग्रजांना महसूल गोळा करण्यास मज्जाव केला. शिवाय जे अधिकारी महसूल गोळा करण्यास इंग्रजांना मदत करत, त्यांच्यावर उमाजी नाईकांनी इ.स. १८२६ ते इ.स. १८२९ या काळात हल्ले केले. साताऱ्याजवळच्या प्रदेशात अनेक ठिकाणी उमाजीने लुटालुट केली. या धावपळीच्या काळात शेवटी उमाजी नाईक इंग्रजांच्या हाती लागला; परंतु उमाजी नाईकला प्रचंड लोकांचा पाठींबा असल्याने इंग्रजांनी रामोशांसोबत तडजोडीने प्रश्न सोडवून अनेकांच्या जमिनी परत केल्या तर काहींना पोलिस दलाच्या नोकरीत सामावून घेतले.

भिल्ल व कोळी जमाती सह्याद्रीच्या पर्वतीय प्रदेशात राहत असे. ब्रिटिश शासन भिल्ल व कोळयांच्या आर्थिक दुरवस्थेचे प्रतीक होते. यामुळे भिल्लांनी व कोळ्यांनी इंग्रजांविरूद्ध शस्त्र उचलले. इ.स. १८२४ ते इ.स. १८५० या काळात अनेक उठाव झाले. ओखामंडलच्या वाघेलांनीही इंग्रजांना प्रतिकार करून शस्त्र हाती घेतले.

## मध्य भारतातील आदिवासी चळवळ

मध्य भारतात प्रामुख्याने गोंड व भिल्ल या आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. आपल्या अस्तित्वासाठी त्यांनी इंग्रजांविरूद्ध चळवळी उभी केल्या.

गोंड या आदिवासी जमातीने इ.स. १८५७ च्या उठावात जमीनदारांमार्फत सहभाग घेतला होता. पुढे इ.स. १९४० ला गोंडानी आपल्या जंगलसंबंधीच्या अधिकारावर होणाऱ्या अतिक्रमणाबाबत प्रतिकात्मक भावना व्यक्त करून ब्रिटिशांविरोधात बंड केले. कुमरा भीमू याने गोंड जमातीच्या लोकांना एकत्रित करून इंग्रजांपुढे गोंडाची शिष्टाई केली. तरीही आदिवासींवर होणारे अत्याचार कमी झाले नाही. उलट ब्रिटिशांनी कुमरा भीमू व त्याच्या साथीदारांवर कारवाई सुरू केली. यामुळे कुमरा भीमूच्या नेतृत्वाखाली गोंड आदिवासी लोक इंग्रजांना विरोध करण्यासाठी शस्त्रानीशी तयार झाले. त्यांनी पोलीसांवर हल्ला केला. या हल्ल्यात कुमरा भीमू व त्याचे साथीदार शहीद झाले. आजही आदिलाबाद जिल्ह्यात (आंध्र प्रदेश) कुमरा भीमूला गोंड आदिवासी समाज शहिद कुमरा भीमू या नावाने ओळखतो.

पुढे गोंड जमातीच्या लोकांनी ज्या चळवळी केल्या त्यांचा उद्देश हिंदूकरण होते. इ.स. १९२९ मध्ये भाऊसिंग आणि राजनेगी यांनी सुधारवादी चळवळीतून गोंड जमातीतील मद्यपान रोखण्यावर भर दिला.

आदिवासी चळवळीमध्ये भिल्ल चळवळ महत्त्वाची चळवळ मानली जाते. हिमालयापासून पश्चिम घाटापर्यंतच्या भौगोलिक प्रदेशामध्ये भिल्लांचे वास्तव्य दिसते. या जमातीचे लोक शेतीबरोबरच वनसंपत्तीवर आपल्या उदरनिर्वाह करतात. परंतु जेव्हा जमीनदार, सावकार, ठेकेदार व इंग्रजी अधिकारी यांनी भिल्लांवर अत्याचार करण्यास सुरूवात केली. तेव्हापासून भिल्लांनी या अत्याचारास प्रतिकार करण्यासाठी चळवळ उभी केली.

ब्रिटिश अधिकारी व सरंजामदार भिल्ल कुटुंबावर अत्याचार करीत. भिल्ल स्त्रियांना छेडणे, शेतीवर ताबा मिळविणे, गुलाम बनविणे इ. मार्फत भिल्ल भरडले जाई. यामुळे भिल्लांनी इंग्रजांच्या विरोधात लढा देण्याचे ठरविले. इ.स. १८१७ मध्ये भिल्लांनी खानदेशमध्ये लुटमार करण्यास सुरूवात केली. हा विद्रोह दडपण्यासाठी इंग्रजांनी पेशव्यांकरवी सैन्य पाठविले. परंतु तरीही भिल्लांना रोखणे इंग्रजांना शक्य झाले नाही. भिल्लांना अन्नधान्य न पोहचणे ही व्यवस्था इंग्रजांनी केली. तेव्हा भिल्लांनी इ.स. १८१९ मध्ये इंग्रजांच्या चौकींना घेरून ब्रिटिशांना हाकलण्याचा प्रयत्न केला. यामध्ये अनेक भिल्ल हौतात्मे झाले. इ.स. १८२० ला पुन्हा भिल्लांनी उठाव केला. ब्रिटिशांनी भिल्लांच्या वस्तींना आगी लावल्या, त्यांच्या हत्या केल्या. परंतू भिल्ल नमले नाहीत. इ.स. १८३१ ते १८५२ या काळातही भिल्ल – इंग्रज लढा चालूच होता. भिल्लांची चळवळ ही अस्तित्वासाठी होती. आपल्या जमीनीचे आपणच मालक आहोत आपल्यावर होणारा अन्याय, अत्याचार आम्ही सहन करणार नाही, यासाठी हा त्यांचा लढा होता. आपल्या आंदोलनाद्वारे भिल्लांनी इंग्रजांना आपले संघटन, शक्ती, सामर्थ्य दाखविले. यानंतर गोंड जमातीसारखी सुधारवादी चळवळ मध्यप्रदेश आणि गुजरातमध्ये भिल्लांनी केली. भिल्लांमधील गोविंदतीरी, भूलिया महाराज, मोतीलाल तेजादत, मामा बालेश्वर दयाल, लसोटिया, विश्वनाथ यांनी धार्मिक सुधारणेसाठी अनेक चळवळी

चालविल्या.

**महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी**

ब्रिटिश सत्तेची स्थापना भारतात झाल्यानंतर इंग्रजांनी महाराष्ट्रमधील भिल्ल, गोंड, महादेव कोळी या आदिवासी जमातीचे हक्क हिरावून घेतले, त्यांच्यावर अनेक बंधने लादली. यामुळे या जमातींनी इंग्रजांविरूद्ध बंड पुकारले. भिल्ल आणि महादेव कोळी या जमातीने नाशिक जिल्ह्यातील नांदगावजवळ मांडवद येथे इ.स. १८३० मध्ये पहिला उठाव केला. या चवळीचे नेतृत्व रामजी भांगरा आणि रामा किरवा या महादेव कोळी जमातीच्या नेत्यांनी केले. या चळवळीचे लोण महाराष्ट्रभर पसरले. इ.स. १८३० मध्ये पुणे जिल्ह्यातील जून्नर प्रांतात भाऊ खरेल, चिमणाची दरबारे आणि जाधव यांच्या नेतृत्वाखाली दूसरा उठाव झाला. यामध्ये ५४ महादेव कोळी लोकांचा मृत्यू झाला. अहमदनगरमधिल अकोलनेरात रतनगडच्या परिसरात रामजी भांगरे यानेही इंग्रजाविरूद्ध चळवळ उभी केली. ही चळवळ दडपून टाकण्यासाठी इंग्रजांनी कॅप्टन मॅकिनोशला पाठवून राघोजी भांगरे यास बंदी बनविण्यात आले. दिनांक २ मे १८४८ मध्ये त्याला ठाणे येथे फाशी देण्यात आली. अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील भिल्ल जमातीने भागोजी नायकाच्या नेतृत्वाखाली इंग्रजांना विरोध म्हणून ब्रिटीश खजिने लुटणे, सैन्याचे नुकसान करणे, जमीनीवर हक्क निर्माण करणे या स्वरूपाचे कार्य केले. भागोजीने तर हातोहातच्या लढाईत कॅप्टन हेन्ड्री आणि कॅप्टन नुताल यांना माघार घेण्यास भाग पाडले. शेवटी १८५९ मध्ये मेजर फ्रँकसाचर सोबत लढता-लढता भागोजी नायक मारला गेल्याने ही चळवळ मंदावली. यानंतर सातपूडा परिसरातील उमेद वसावा या भिल्ल नेत्याच्या नेतृत्वाखाली पाच हजार भिल्ल एकत्र येऊन स्थानिक आर्मी स्थापन केली. यामुळे इंग्रजांनी वाटाघाटी करून भिल्लांना काही हक्क प्रदान केले.

इंग्रजांबरोबर आदिवासी समाजाचे शोषण सावकारही करीत म्हणून पुणे जिल्ह्यात १८७४ मध्ये होण्या कॅंगले याने महादेव कोळी जमातीच्या लोकांना एकत्रित करून सावकारांवर दरारा निर्माण केला. यामुळे इंग्रजांनी १८७६ मध्ये होण्या कॅंगलेला पकडून फाशीची शिक्षा दिली. दुष्काळमय स्थितीत सावकार आदिवासींच्या जमिनी हडपत या शोषणाविरूद्ध तरूण आदिवासींनी चळवळ उभी केली. या चळवळीमध्ये कोंडा नवले, बालू पिचड, ढवळा माकरे, सत्तु मराडी यांचा सहभाग होता. या सर्व चळवळी इंग्रजांनी क्रूरपणे दडपून टाकल्या.

**सारांश:**

इ.स. १७६० पासून इंग्रजी सत्तेच्या विरोधात अनेक उठाव झाले. यामध्ये आदिवासींचा मोठा वाटा आहे. हे सर्व उठाव इंग्रजांनी लष्कराच्या मदतीने, भेदनीतीचा वापर करून क्रूर पद्धतीने मोडून काढले; परतु भारतीयांच्या मनातील धगधगणारा असंतोष मात्र कायम होता. याची झळ इंग्रजांना १८५७ च्या उठावाने सोसावी लागली. १८५७ च्या उठावाची व्याप्ती संपूर्ण भारतभर होती. या उठावाने इंग्रजी सत्ता हादरून गेली व ब्रिटिशांना कंपनी सरकार बरखास्त करून भारताचा कारभार पार्लमेंटच्या हाती सोपवावा लागला. इ.स. १८५८ ला राणीचा जाहिरनामा प्रसिद्ध होऊन भारतीय संस्थानिक, राजे-रजवाडे व आदिवासी जमातींना अनेक सवलती देण्यात आल्या. इ.स. १८५८ ला इस्ट इंडिया कंपनीचा अस्त होऊन भारतावर प्रत्यक्ष ब्रिटीश पार्लमेंटची सत्ता प्रस्थापीत झाली. परंतू इंग्रजी सत्तेचे शोषण थांबले नाही. यामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आदिवासींनी इंग्रजांना प्रतिकार करण्याचे सत्र चालूच ठेवले.

**संदर्भ ग्रंथ:**


१. Dr. Rivers - Races and Culture of India.
२. Gillin And gillin - Cultural Sociololgy
३. डॉ. दा. धो.काचोळे - आदिवासी समाजशास्त्र
४. डॉ. दा. धो.काचोळे - आदिवासी समाजाचे समाजशास्त्र
५. डॉ. श्रीकांत गायकवाड - भारतातील सामाजिक चळवळी
६. डॉ. प्रदिप आगलावे - आदिवासी समाजाचे समाजशास्त्र
७. डॉ. प्रदिप आगलावे - समाजशास्त्र : संकल्पना आणि संरचना
८. डॉ. एस जी देवगावकर - महाराष्ट्रातील निवउक जाती
९. डॉ. राजेंद्रकुमार शर्मा - ग्रामीण समाजशास्त्र
१०. डॉ. डी एस मनवर - भारतीय समाज प्रश्न आणि समस्या
११. डॉ. घायाळ एस पी - आदिवासी समाजाचे समाजशास्त्र



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI
PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

भारतातील विविध सामाजिक चळवळींचे आणि त्यांच्या प्रेरणांचे प्रतिबिंब भारतीय संविधानातील जिवनमुल्यांमध्ये दिसुन येतात.कोणत्याही समाज क्रांतीसाठी जनाधाराची अनिवार्यता आवश्यक असते. शेतकरी चळवळ, आरक्षण चळवळ, मानवाधिकार चळवळ, आदिवासी चळवळ, स्त्रीवादी चळवळ किंवा इतर सर्व क्रांतीकारी व परिवर्तनवादी चळवळीसाठी जनमताचा सहजाविष्कार होत असतो. म्हणून सामाजिक व राजकीय चळवळीला तिचे लोकशाही अविष्करण करण्यास पूर्ण मूभा असली पाहिजे. कारण ऐतिहासिक कालखंडापासून ते आजपर्यंत स्वातंत्र्य आणि लोकशाहीकडेच मानवी मताचा स्वाभाविक कल राहिलेला आहे. म्हणून भारतातील परिवर्तनवादी लोक, जनआंदोलनातील सर्व समविचारी प्रवाह, राजकीय विचार प्रणालीच्या समर्थकांनी एकत्र येवून लोकोन्नतीच्या कार्यास वाहून घेणे सांप्रत काळाची गरज आहे.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

अथर्व पब्लिकेशन्स्
ऑनलाईन पुस्तक खरेदीकरिता...
www.atharvapublications.com

ISBN 978-93-88544-74-0
₹ - 995/-